रजि. नं. एस.ए.टी. / माण/बी.एन.के./ओ./११९, सन १९९६
दि. ३१/१०/९६, एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी.

# माण देशी
## महिला सहकारी बँक लि., म्हसवड
ता. माण, जि. सातारा




ललिता तुला माण देशी
जनतेचा सलाम !

**१९ वा वार्षिक अहवाल**
**सन २०१५-२०१६**
**ऑडीट वर्ग 'अ'**

## संचालक मंडळ (सन २०११-१२ ते २०१६-१७)

माण देशी बँक


श्रीमती चेतना सिन्हा
अध्यक्षा (म्हसवड)


सौ. गीता ग. रसाळ
उंपाध्यक्षा (म्हसवड)


सौ. मंजुषा रा. सुर्यवंशी
संचालिका (म्हसवड)


सौ. निर्मला म. मोरे
संचालिका (गोंदवले खुर्द)


सौ. स्वाती नि. चिंचकर
संचालिका (म्हसवड)


सौ. ललीता सा. पोळ
संचालिका (देवापूर)


सौ. संगिता म. काटकर
संचालिका (कुकुडवाड)


सौ. वर्षा ल. खाडे
संचालिका (पळशी)


सौ. राणी सं. गोरड
संचालिका (दिडवाघवाडी)


सौ. विमल दि. घुटुकडे
संचालिका (विरळी)


सौ.राजश्री नि. दोशी
संचालिका (म्हसवड)


सौ. वनिता जा. पिसे
संचालिका (म्हसवड)


सौ. शारदा बा. मदने
संचालिका (बनगरवाडी)


सौ. सिताबाई आ. पुकळे
संचालिका (पुकळेवाडी)


सौ. रेखा अ कट्टे
संचालिका (गोंदवले बु.)


सौ. नूतन प्र. शेटे
संचालिका (वडूज)


सौ. कांचन कि. शिंदे
संचालिका (बोथे)


सौ. अरूणा अ. सावंत
संचालिका (क्षेत्र माहुली)


श्री. विजयकुमार केसकर
तज्ञ संचालक (गोंदवले बु।।)


सौ. दिपाली गवळी
तज्ञ संचालिका, (कोल्हापूर)


सौ. रेखा सु. कुलकर्णी
मुख्य कार्यकारी अधिकारी



माण देशी महिला बँकेने नवीन सुरू केलेल्या
''मायक्रो एटीएम डीव्हाईस'' उद्घाटन प्रसंगी
मा. श्री. चंद्रकांत दळवी सहकार आयुक्त महाराष्ट्र राज्य
पुणे, मा. श्री. अश्विन मुद्‌गल जिल्हाधिकारी सातारा,
मा. श्री. नितीन पाटील मुख्य कार्यकारी अधिकारी
जि. प. सातारा, मा. डॉ. श्री. महेश कदम जिल्हा
उपनिबंधक सहकारी संस्था सातारा, व इतर मान्यवर
समवेत श्रीमती चेतना सिन्हा व सौ. रेखा कुलकर्णी

माण देशी फौंडेशन, म्हसवड निर्मित माण नदी पुनर्जीवन
जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत भूमीपूजन व गलंडे
वस्ती (पुळकोटी) येथे बांधण्यात आलेल्या सिमेंट
बंधाऱ्याच्या लोकार्पण सोहळ्याचा कार्यक्रम
मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील महसूल, पुर्नवसन
आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य,
यांच्या शुभहस्ते करण्यात आला
समवेत मा. ना. श्री. सदाभाऊ खोत
कृषी व फलोत्पादन, पणन राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य,
मा. आ. श्री. जयकुमार गोरे
माण खटाव विधानसभा सदस्य,
व श्री. जयेश मोदी, वरिष्ठ अधिकारी एच.एस.बी.सी. बँक






माण देशी महिला बँकेने आठवडा बाजारात व्यवसाय
करणाऱ्या महिलांसाठी सुरु केलेल्या
''रूपे डेबिट कार्डचा शुभारंभ''
मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील महसूल, पुर्नवसन
आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य,
यांच्या हस्ते करण्यात आला समवेत
मा. ना. श्री. सदाभाऊ खोत कृषी व फलोत्पादन,
पणन, राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य,
मा. आ. श्री. जयकुमार गोरे माण खटाव विधानसभा
सदस्य





माण देशी महिला बँक शाखा धायरी येथे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी बँकेस भेट देवून बँकेच्या कार्याची माहिती घेतली त्याप्रसंगी श्रीमती चेतना सिन्हा व इतर कर्मचारी





दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि. तर्फे ''सर्वोत्कृष्ट बँक'' या पुरस्कारासाठी महिला बँक गटातून माण देशी बँकेस तृतीय क्रमांक देवून गौरविण्यात आले, त्याप्रसंगी मा. ना. श्री. चंद्रकांतदादा पाटील महसूल, पुर्नवसन आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री महाराष्ट्र राज्य, यांचे हस्ते पुरस्कार स्विकारताना माण देशी बँकेच्या संचालिका सौ. रेखा कट्टे, सौ. वनिता पिसे, सौ. राणी गोरड व सौ. रेखा कुलकर्णी मुख्य कार्यकारी अधिकारी व सौ. सुषमा शेंडगे मुख्य वित्तीय अधिकारी





माण देशी फौंडेशनतर्फे माण देशी उद्योजिका महिलांना मा. डॉ. मीरां चड्डा बोरवणकर, (IPS) महासंचालक न्यायिक व तांत्रिक, महाराष्ट्र राज्य व अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड यांच्या हस्ते पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले त्याप्रसंगीचे छायाचित्र सोबत माण देशी महिला बँकेच्या संचालिका

# १९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की, आपल्या बँकेची एकोणीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २४।०९।२०१६ रोजी दुपारी १२ वाजता माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी होणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

**• सभेपुढील विषय •**

१. दिनांक ११-८-२०१५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून नोंद घेणे.
२. दि. ३१ मार्च २०१६ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक वाचून मंजूर करणे.
३. सन २०१५-२०१६ मधील नफ्याची मा. संचालक मंडळाने सुचविलेनुसार नफा वाटणीस मंजुरी देणे.
४. सन २०१५-२०१६ चे शासकिय लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.
५. सन २०१५-२०१६ चे शासकिय लेखापरिक्षण दोषदुरुस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
६. सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरिता वैधानिक हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
७. सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षाकरीता अंतर्गत हिशोब तपासणीसांची नेमणुक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८. सन २०१६-२०१७ सालाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे व सन २०१५- २०१६ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा ज्या बाबीवर अधिक खर्च झाला आहे. त्यास मान्यता देणे.
९. संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत चर्चा करणे.
१०. मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या पोट नियम दुरुस्तीबाबत मंजूरी देणे.
११. मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या प्रमाणे शाखा विस्तारास मान्यता देणे.
१२. संचालक मंडळाच्या सन २०१६-१७ ते २०२१-२२ या कालावधी करीता झालेल्या निवडणूक निकालाची नोंद घेणे.
१३. सभासंदासाठी बँकिंग शिक्षण व प्रशिक्षणाबाबत चर्चा करणे.
१४. माण देशी महिला सहकारी बँक व माण देशी फौंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविलेल्या उपक्रमांची चर्चा करुन नोंद घेणे.
१५. वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१६. मा. अध्यक्षांच्या पुर्वपरवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

संचालक मंडळाच्या हुकुमावरुन
**माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड**

नोटीस दिनांक १०/९/२०१६
सभेचे स्थळ :- तृप्ती मंगल कार्यालय
सातारा-पंढरपूर रोड,म्हसवड
वेळ: दुपारी १२ वा.

**सौ. रेखा सु. कुलकर्णी**
मुख्य कार्यकारी अधिकारी
माण देशी महिला सह. बँक लि. म्हसवड

**विशेष सुचना :-**

१. गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेणेत येईल.
२. सभेच्या वेळी विचारावयाचे प्रश्न आणि सुचना दि. १७/०९/२०१६ पूर्वी बँकेच्या कार्यालयात मिळतील अशा रितीने पाठवाव्यात. ३. संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक हे बँकेच्या नोंदणीकृत मुख्य कार्यालयात आणि सर्व शाखांमधून सभासदांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. ४. बँकेची वेबसाईट www.manndeshibank.com वर संचालक मंडळाचा अहवाल, ताळेबंद व नफा - तोटा पत्रक प्रसिद्ध केले आहे.

**सन्माननीय सभासद भगिनींनो,**

२० वर्षापूर्वी, सातारा जिल्हयातील, माण तालुक्यातील माण देशी महिला, रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांसमोर ठाण मांडून बसलेल्याची आठवण आज अहवाल लिहिण्याचे निमित्ताने डोळ्यासमोर तरळून गेली. त्या वाट पहात थांबलेल्या होत्या की, माण देशी बँकेचा जो प्रस्ताव सहा महिन्यापूर्वी रिझर्व बँकेने, संचालक निरक्षर असले कारणाने दुरुस्त करण्यास सांगितले होते, तो प्रस्ताव दुरुस्त केल्यावर त्यास मंजूरी मिळावी.

आज माण देशी बँक उभी आहे ती माण देशी महिलांमुळे. त्यामुळे ज्यावेळी कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या ''गोदावरी गौरव'' पुरस्काराने मला सन्मानित करण्यात आले, त्यावेळी असे वाटले की,'' हा गौरव माझा नसून माण देशी महिलांचा आहे.''

माझे लहानपण मुंबईत गेले, मी श्री. जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलनात सहभागी झाले. ग्रामीण भागात राहायला आल्यावर मी सर्वप्रथम शौचालयासाठी उपोषण केले. १९८६-८७ साली पंचायतराज विधेयकामध्ये नवीन दुरुस्ती झाली. त्यामुळे पंचायतीमध्ये महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव करण्यात आल्या. मी गावातल्या महिलांमध्ये या गोष्टीची जाणीव निर्माण करुन देवू लागले. महिला ग्रामसभेमध्ये भाग घेवू लागल्या. लवकरच, महिलांसाठी सामाजिक कार्य करण्याच्या उद्देशाने **''माण देशी फौंडेशन''** या संस्थेची स्थापना १९९६ साली केली. महिलांना लहान बचत करता यावी म्हणून पुढे १९९७ साली **''माण देशी बँक''** सुरु झाली. विशेष म्हणजे महिला सबलीकरणाच्या उद्देशाने सुरु झालेल्या या दोन्ही संस्था आपल्या माण देशी महिलाच यशस्वीपणे चालवित आहेत याचा अभिमान वाटून आज उर दाटून येत आहे.

बँक सुरु झाल्यावर सुरुवातीला जे आव्हान समोर आले ते म्हणजे आपल्या महिलांचे हातावरचे पोट. आज बँकेत यायचं म्हणजे त्यांना एक दिवसाच्या रोजगाराला मुकावे लागणार, अशा गरजू महिलापर्यंत पोहोचता यावे म्हणून घरपोच बँकिंगची सोय सुरु केली. दुसरी गरज अशी होती की, महिलांना त्यांची बचत सुरक्षित पाहिजे होती, त्यांना त्यांच्या कष्टाच्या कमाईचा वापर मुलांच्या शिक्षणासाठी, मुलीच्या लग्नासाठी, अडीनडीला गरज भासल्यास करायचा होता. महिलांची बचत सुरक्षित रहावी म्हणून माण देशी बँकेने एटीएम कार्डची सुविधा सुरु केली आणि ही सुविधा अगदी आठवडा बाजारात बसून भाजी, मसाले, वडापाव, चहा, मातीची भांडी विकणाऱ्या महिलांपर्यंत पोहचवली. महिलांना बाजारात आल्यावर घाऊक व्यापाऱ्याकडून माल घेवून तो किरकोळ बाजारात विकण्यासाठी रोख रकमेची गरज असते. पूर्वी असा माल खरेदी करण्यासाठी स्थानिक सावकारांकडून पैसे उधार घेतले जात. ज्याचा व्याजदर अव्वाच्या सव्वा असे, परंतु आता बँकेचे एजंट महिलांना

सकाळी ८ वाजता जागेवर रोख पैसे हातात देतात आणि संध्याकाळी वसुली देखील बाजारात जावून करतात, म्हणजे महिलांचा वेळ देखील वाचला, रोख पैसा हातात आल्यामुळे चांगल्या दर्जाचा व विविध पद्धतीचा माल त्या ठेवू लागल्या. महिलांना त्यांच्या गुंतवणूकीवर जास्तीत जास्त परतावा मिळू लागला. त्यामुळे त्या संध्याकाळी परतफेड देखील करु लागल्या. शिवाय सावकाराच्या चक्रवाढ व्याजाच्या पैशातून त्यांची मुक्तता झाली ती वेगळीच. कर्जाची भिती बाळगणाऱ्या या महिला आज लाखोंची उलाढाल मोठ्या आत्मविश्वासाने करत आहेत.

काळाच्या बरोबर बँकिंग बदलले. ग्राहकांना घरुन बँकिंग करणे, केव्हाही कोठूनही बँकिंग, ऑनलाईन बँकिंग करता यावे यासाठी माण देशी बँकेने कोअर बँकिंग प्रणाली अवलंबिली. आनंदाची गोष्ट म्हणजे, खातेदारांच्या सोयीसाठी आरटीजीएस, एनईएफटी, मोबाईल बँकिंग, रुपे डेबिट कार्डची(एटीएम) सुविधा बँकेने उपलब्ध करुन दिली आहे.

आज, माण देशी बँकेचे नाव जगभर पसरले आहे. म्हसवड सारख्या ग्रामीण भागात सुरु होवून आज माण देशी बँक सातारा, सांगली, सोलापूर, रत्नागिरी, रायगड, पुणे आणि कोल्हापूर या सात जिल्ह्यात आपल्या कार्याचा विस्तार करत आहे. भविष्यात संपूर्ण महाराष्ट्रभर आपल्या कार्याचा विस्तार करण्याचा माण देशी बँकेचा मानस आहे. जगभरातील प्रख्यात संस्थामधून व रिझर्व बँकेमधून अधिकारीवर्ग, विदेशी युनिव्हर्सिटीमधून विद्यार्थी, माण देशी बँकेस भेट देवून माण देशीच्या कार्याची माहिती घेतात. यावरुन माणदेशी महिलांनी माणदेशाच्या मातीची ताकद सिद्ध केली आहे हे लक्षात येते.

**आपली स्नेहांकित,**
**श्रीमती चेतना सिन्हा**
**अध्यक्षा**

# चालू वर्षातील घडामोडी

माण देशी महिला सहकारी बँकेने २० व्या वर्षात पदार्पण केले आहे. दुष्काळी माण तालुक्यातील कष्टकरी महिलांच्या आर्थिक सबलीकरणाच्या प्रमुख उद्देशाने चेतना सिन्हा यांनी माण देशी महिला सहकारी बँकेची स्थापना केली. त्यांच्या या कार्यामुळे गेल्या वीस वर्षाच्या कालखंडात माण देशी महिलांना खऱ्या अर्थाने सक्षमीकरणाची चालना मिळू शकली.

सन २०१५-१६ ची विशेष बाब म्हणजे, माण देशी महिला बँकेने रुपे कार्ड एटीएम सेवा आपल्या शाखांमध्ये सुरु केली. बँकेच्या ग्राहकांना रुपे कार्ड वापरण्याची सोय उपलब्ध करुन देण्याबरोबर रस्त्यावर व आठवडे बाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी हे कार्ड वापरण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे ग्राहकांना त्यांच्या दारात म्हणजेच व्यवसायाच्या ठिकाणी अत्याआधुनिक मायक्रो एटीएमच्या माध्यमातून सेवा पुरविण्याची सोय निर्माण झाली आहे. याबरोबरच माणदेशी बँकेने आरटीजीएस, एनईएफटी व एसएमएस बँकिंग सारख्या सुविधा देखील सुरु केलेल्या आहेत.

## बँकेने ग्राहकांसाठी उपलब्ध केलेल्या सेवा:

**१. कोअर बँकिंग:** बँकेने कोअर बँकिंग प्रणालीचा अवलंब केला असून बँकेच्या सर्व ग्राहकांसाठी एसएमएस बँकींगची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. ज्या ग्राहकांनी बँकेकडे आपल्या मोबाईल नंबरची नोंदणी केली अशा सर्व ग्राहकांना त्यांच्या खात्यावरील प्रत्येक व्यवहाराच्या नोंदी एसएमएस द्वारे कळविल्या जातात.

**२. रुपे डेबीट कार्ड:** बँकेने अत्याधुनिक मायक्रो एटीएम मशीन व रुपे डेबीट कार्ड च्या सहाय्याने आठवडा बाजारात बसून व्यवसाय करणाऱ्या महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या ठिकाणीच सर्व आर्थिक व्यवहार करता यावेत याची सोय उपलब्ध करुन दिली आहे. बँकेने ईएमव्ही रुपे डेबीट कार्ड व विक्री केंद्र (POS) सेवा सुरु केली आहे. याद्वारे ग्राहकांना शॉपींग मॉल्स, पेट्रोल पंप, हॉटेल्स्, इन्शुरन्स इ. ठिकाणी रुपे कार्ड द्वारे पेमेंट करणे शक्य आहे. बँकेने रुपे कार्ड अंतर्गत ग्राहकांना एटीएम ची २४×७ सुविधा उपलब्ध करुन दिली असुन देशांतर्गत इतर कोणत्याही बँकेच्या एटीएम मधून पैसे काढणे शक्य झाले आहे.

**३. आधारकार्ड बेस्ड पेमेंट सिस्टिम:** बँकेने आधारकार्ड बेस्ड पेमेंट सिस्टिमचा अवलंब केला असुन या प्रणालीद्वारे ग्राहकांना शासनाकडून मिळणारे सर्व प्रकारचे अनुदान त्यांच्या खात्यावर थेट जमा केले जाते. या योजनेअंतर्गत खातेदारास गॅस सबसिडीची रक्कम, ठिबक सिंचनापोटी मिळणारे अनुदान तसेच शासकीय/ निमशासकीय उदा: एल.आय.सी., प्रॉव्हीडंट फंड इ. कडून येणे रक्कमा आपल्या बँकेतील खात्यात थेट जमा करता येतात. अजुनही ज्या खातेदारांनी आपला आधार कार्ड क्रमांक नोंद केला नाही त्यांनी तो नोंद करुन सदर योजनांचा लाभ घ्यावा असे बँकेतर्फे आवाहन करण्यात येत आहे.

**४. आय.एफ.एस.कोड:** बँकेचा आय.एफ.एस.कोड(YESBOMAN001) असुन तो प्रत्येक चेकवर तसेच पासबुकवर नमुद आहे. या कोडद्वारे बँकेच्या खातेदारास देशांतर्गत कोणत्याही बँकेकडून रक्कम आपल्या बँकेतील खात्यावर थेट जमा करता येईल.

**५. आरटीजीएस व एनईएफटी:** बँकेने इनवर्ड व आऊटवर्ड आरटीजीएस व एनईएफटीची सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करुन दिली आहे. आऊटवर्ड आरटीजीएसने देशांतर्गत कोणत्याही बँकेच्या खात्यात आपल्या बँकेच्या खात्यातील रक्कम ट्रान्सफर करता येईल व इनवर्ड आरटीजीएसच्या माध्यमातून रक्कम स्वीकारली जाईल.

**६. सीटीएस क्लिअरींग सुविधा:** बँकेने ग्राहकांना सीटीएस क्लिअरींगची सुविधा उपलब्ध करुन दिली असुन या प्रणाली अंतर्गत देशातील कोणत्याही शहरातील चेकची रक्कम (जर संबंधित बँक सीटीएस क्लिअरींगची मेंबर असलेस) दुसऱ्या दिवशी संबंधीत खातेदाराच्या खात्यात थेट जमा केली जाते.

**७. पॅन कार्ड:** बँकेने आपल्या ग्राहकांसाठी नवीन पॅन कार्ड काढणेची सुविधा उपलब्ध करुन दिली असुन ज्यांना पॅन कार्ड काढावयाचे असेल त्यांनी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.

**८. वीज बील:** बँकेच्या शाखांमध्ये वीज बील स्वीकारण्याची सोय उपलब्ध आहे.

**९. हेल्प लाईन:** ग्राहकांना हेल्प लाईन म्हणून बँकेने टोल फ्री नंबर उपलब्ध करुन दिला आहे. तो नंबर १८००-२१२-२११२ हा आहे.

## रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांची माण देशी बँकेस भेट:-

२६ एप्रिल २०१६ रोजी रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांनी माण देशी बँक, शाखा धायरी,पुणे येथे भेट देवून बँकेने नव्याने सुरु केलेल्या मायक्रो-एटीएम सुविधा, गट कर्ज वाटप, आठवड्याबाजारात व्यवसाय करणाऱ्या महिलांना कर्ज वाटप या योजनांची माहिती घेवून माण देशी बँकेच्या लाभार्थी महिलांशी चर्चा केली. ''माण देशी बँक 'महिला उद्योजिका' घडविणे हा उद्देश उराशी बाळगून महिला उद्योजिकांना भांडवल व माण देशी फौंडेशनमार्फत महिलांना प्रशिक्षण देवून त्यांना सबल करते. जगभरात माण देशीच्या दुहेरी संगमाचा(घरपोच भांडवल व घरपोच व्यवसाय प्रशिक्षण) लाभ मिळवून देणारे माण देशी रोल मॉडेल हे एकमेव मॉडेल आहे.'' असे उद्‌गार माण देशी बँक भेटी प्रसंगी रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या अधिकाऱ्यांनी काढले.

## नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बँक मॅनेजमेंट, पुणे तर्फे आयोजित प्रशिक्षण अभ्यासक्रमामध्ये माण देशी रोल मॉडेलचा समावेश व सार्क (SAARC)बँकर्सची माण देशीस भेट:

''कौशल्य प्रशिक्षणातून महिला विकास '' या धर्तीवर नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ बँक मॅनेजमेंट, पुणे तर्फे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश, व भारतातील नॅशनल को-ऑपरेटिव्ह ऑफ कौन्सील, पोस्ट अॅन्ड टेलिकॉम एम्पलॉइज को-ऑपरेटिव्ह बँक सोसायटी, को-ऑपरेटिव्ह अॅन्ड चिफ मिनिस्टर ऑफिस सेंट्रल प्रोव्हिन्स श्रीलंका, नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कार्पोरेशन, इन्स्टिटयुट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट, साना किसान बिकास बँक लि. नेपाळ राष्ट्र बँक, नेपाळ फेडरेशन ऑफ सेव्हिंग्ज अॅन्ड क्रेडिट को-ऑपरेटिव्ह युनियन्स लि. या संस्थांचा समावेश करण्यात आला होता. या प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा भाग म्हणून माण देशी बँक व माण देशी फौंडेशन या संस्थांचा ''रोल मॉडेल '' म्हणून समावेश करण्यात आला होता. ११ मे, २०१६ रोजी वरील नमूद केलेल्या संस्थांचे संस्थापक, संचालक, सचिव व व्यवस्थापक अशा एकूण ३० अधिकाऱ्यांनी माण देशीस भेट देवून महिलांसाठी राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती घेतली.

# १९ वा वार्षिक अहवाल सन २०१५-१६

## भागभांडवल :-

बँकेचे अधिकृत भागभांडवल रु. ७ कोटीचे आहे. वर्ष अखेरीस रु. ५१७.३७ लाख एवढे जमा झाले आहे. या वर्षात भागभांडवलांत रु. ४७.३६ लाख इतकी वाढ झालेली असून ही वाढ १०.०८ % एवढी आहे. वर्षाअखेर एकूण ४०४५ नवीन सभासद झाले तसेच मृत्यू राजीनामा इत्यादीमुळे ९१४ सभासद कमी झाले. त्यामुळे वर्षाअखेर एकूण सभासद संख्या २५८३२ झाली आहे.

## गंगाजळी व निधी :-

मागील वर्षाअखेर गंगाजळीसह इतर निधी रु. १६०.२९ लाख होती अहवाल वर्षात त्यात रु. ४६.८० ने वाढ होऊन अहवालवर्षा अखेर गंगाजळी, थकव्याज निधी,राखीव निधीची रक्कम रु. २०७.०९ लाख इतकी झाली आहे. या वर्षात वाढीचे शेकडा प्रमाण २९.२० % इतके आहे.

## ठेवी व विमा संरक्षण :-

मार्च २०१५ च्या ठेवी रु. ७६३३.२९ लाखावरुन मार्च २०१६ अखेर रु. ८७८२.०७ लाख एवढ्या झाल्या आहेत ही वाढ रु. ११४८.७८ इतकी असून, ठेव वाढीचे प्रमाण १५.०५% आहे. या वाढत्या व बदलत्या स्पर्धेत ठेव वाढी बरोबर नफा क्षमता वाढविणे हे ही महत्वाचे आहे त्यामुळे ठेवीच्या व्याजावरील खर्चाचे प्रमाण विचारात घेता ठेवीवरील व्याज दर कमी करावे लागले तरीही आपण एवढ्या ठेवी गोळा केल्या. सभासदांचा,ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास स्पष्ट आहे सर्व ठेवी डिपॉझिट इन्श्युरन्स आणि क्रेडिट गॅरंटी कार्पोरेशन (DICGC) अंतर्गत सुरक्षित आहेत. त्यांची दर सहामाही विम्याच्या हप्त्याची रक्कम डी.आय.सी. जी.सी. (DICGC) कडे बँक भरते.

## कर्ज :-

गतवर्षी येणे कर्ज रु. ५३१८.४८ लाख इतके होते या वर्षी त्या मध्ये रु.११८.९६ लाख एवढ्या रकमेची घट झालेली आहे. एकूण कर्ज मार्च २०१६ अखेर ५१९९.५२ लाख एवढे आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकाप्रमाणे योग्य तारणी कर्ज वाटपाबद्दल केलेल्या मार्गदर्शना प्रमाणे कर्जवाटप करणे आवश्यक असलेने,चालू वर्षात आम्ही कर्ज प्रकारात वाढ करुन नवीन कल्पना आपल्यापुढे ठेवणार आहोत, स्थानिक लोकांना कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना राबविणार आहोत, बँकेचे ठेवीदारांशी, खातेदारांशी, कर्जदारांशी नेहमी सलोख्याचे संबंध असावेत म्हणून त्यात आम्ही नेहमी भर घालतो.

## अग्रक्रम क्षेत्रात कर्ज :-

भारतीय रिझर्व बँक धोरणाप्रमाणे एकूण कर्जाच्या ४०% कर्ज अग्रक्रम क्षेत्रास असावे. आपल्या बँकेत २०१५-२०१६ सालात सुद्धा अग्रक्रम क्षेत्रास ९३.६१% कर्जवाटप केलेले आहे. ही आपली अभिमानाची बाब आहे. तसेच दुर्बल घटकांना ८८.४५% कर्जवाटप केले आहे.

## थकबाकी व कर्जवसुली :-

बँकेच्या आर्थिक उन्नतीमध्ये कर्जवाटप व त्यावरील व्याजाची व हप्त्यांची परिणामकारक वसुलीचा फार मोठा वाटा आहे. त्या दृष्टिने बँकेने सतत पाठपुरवठा केल्यामुळे अहवाल वर्षात थकबाकी चे प्रमाण नियंत्रीत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे त्यामुळे थकबाकीचे प्रमाण २.२५% इतके आहे व वसुली ९७.७५% झाली आहे. व NPA चे प्रमाण ०.५२% आहे.

## संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे :-

बँकेच्या एकाही संचालकाकडे बँकेचे कर्ज नाही.

**नफा वाटणी :-** २०१५-१६ या वर्षाच्या नफ्याची वाटणी खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| चालू सालचा नफा | ४१८५३७०.६४ | |
| राखीव निधी | ४४% | १८४१५६३.०८ |
| इमारत निधी | ४३.३४% | १८१३८०७.५६ |
| गुंतवणूक चढउतार निधी | १२.६६% | ५३००००.०० |
| एकूण | १०० % | ४१८५३७०.६४ |

## शाखा विस्तार :-

बँकेला सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, पुणे, कोल्हापूर व रायगड या सात जिल्ह्यांच्या कार्यक्षेत्राची मान्यता मिळालेली आहे. भविष्यात बँक या सात जिल्ह्यांत शाखांचे विस्तारीकरण करणार आहे. बँक शाखा विस्तारासाठी RBI ला प्रस्ताव पाठविणार आहे.

## सभासदांची वर्गवारी:-

महाराष्ट्रातील मागासवर्गीय महिलांना एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रतिनिधीत्व देणारी आपली पहिलीच महिला बँक आहे.

१) मागासवर्गीय - २९% २) ओ.बी.सी. - २६% ३) एन्. टी. २०% ४) ओपन - २५%

## गुंतवणूक:-

बँकेने दि. ३१/३/२०१६ या वर्षात रु. ३४४०.७३ लाख इतकी गुंतवणूक केलेली आहे. सरकारी रोखेमध्ये गुंतवणूक २१७१.१३ लाख व इतर बँकेमध्ये १२८२.६० लाख गुंतवणूक केलेली आहे.

## अंतर्गत तपासणी -

बँकेचे ३१/३/२०१६ अखेर संपणाऱ्या सहकारी वर्षासाठी अंतर्गत लेखापरिक्षण श्री. मनोज आडके आणि कं. चार्टर्ड अकौटंटस् ,कोल्हापूर व संगीता एस. अग्रवाल पुणे चार्टर्ड अकौटंटस यांनी केले असुन त्यांनी बँकेस बहुमोल सुचना व मार्गदर्शन केले आहे.

## प्रशिक्षण कार्यक्रम:-

दरवर्षीप्रमाणे सन २०१५-१६ मध्ये माण देशी बँकेद्वारे संचालक व कर्मचाऱ्यांना कर्ज, वसुली गट कर्ज वाटप, कॅशिअर, बँकिंग सॉफ्टवेअर संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. याशिवाय खालील विषयावंर प्रशिक्षण देण्यात आले.

| | प्रशिक्षण विषय | प्रशिक्षणार्थी | प्रशिक्षक |
|---|---|---|---|
| १. | टीडीएस, टीडीएस रिटर्न आणि इनकम टॅक्स | शाखाधिकारी | सातारा जिल्हा नागरी सह. बँक्स् असोसिएशन लिमिटेड |
| २. | श्री. आर. गांधी हाय पावर कमिटी यांचा अहवाल व श्री. जसबीरसिंग डी. आय. जी. सी. इन्शुरन्स प्रिमीयमच्या अहवालातील तरतुदी | मुख्य वित्तीय अधिकारी व संचालक | मा. श्री. विद्याधर अनास्कर अध्यक्ष महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन मुंबई |
| ३. | ग्रामीण विकास शेती पतपुरवठ्याच्या विविध बाबी | कर्ज विभाग अधिकारी | बँकर्स ग्रामीण विकास संस्थान, लखनऊ |
| ४. | टीडीएस, के. वाय. सी. आणि ग्राहक सेवा इ. संबंधित प्रशिक्षण | माण देशी बँक कर्मचारी | अ) श्री. दिपक गाडवे चार्टर्ड अकौंटंट,कोल्हापूर<br>ब) श्री. अनिल जोशी चार्टर्ड अकौंटंट,सांगली |
| ५. | कासा, एनपीए मॅनेजमेंट, के. वाय. सी. आणि ग्राहक सेवा इ. | माण देशी बँक सर्व कर्मचारी | श्री. के. सी. मिश्रा निवृत्त वरिष्ठ अधिकारी,आरबीआय |

## अभिनंदन:-

माण तालुक्यातील मोही गावच्या कु. ललिता बाबर यांना रिओ ऑलिम्पिक २०१६ मध्ये दहाव्या क्रमांकाने यश मिळाल्याबद्दल माण देशी परिवारातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

* माण देशी फौंडेशन तर्फे ललिता बाबर यांना रुपये १ लाखाचे बक्षिस.

*********

## श्रद्धांजली:-

* शेतकरी संघटनेचे नेते कै. शरद जोशी यांचे दि. १२ मार्च २०१६ रोजी निधन झाले त्यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. १९८० च्या दशकात त्यांना शेतकऱ्यांचे पंच प्राण म्हणून संबोधले जायचे. शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणाऱ्या या पहिल्या योद्ध्यास कोटी कोटी प्रणाम.
* शहीद जवान कै. कर्नल संतोष महाडिक, पोगरवाडी-सातारा व कै. सुनिल सुर्यवंशी, मस्करवाडी(कुकुडवाड) ता. माण यांना माण देशी परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

अहवाल सालात बँकेचे जे ज्ञात, अज्ञात, सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या तसेच देशाच्या सीमारक्षणासाठी ज्या शूर जवानांनी आत्मबलिदान केले त्यांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली.

## बँकेची वैशिष्ट्ये

* व्यापारी बँकापेक्षा ठेवीवर अर्धा टक्का अधिक व्याज.
* नवीन पॅनकार्ड काढण्याची सुविधा
* आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. एस.एम.एस. बँकींग सेवा उपलब्ध.
* अत्याधुनिक मायक्रो ए.टी.एम. मशीन व रुपे डेबीटकार्डच्या साहाय्याने आर्थिक व्यवहार
* चेक ट्रंकेशन सिस्टिम (सी.टी.एस.)
* रुपये १ लाख पर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण
* वीजबीले स्विकारण्याची सोय * महिलांसाठी UTI पेन्शन योजना
* आठवडे बाजार करणाऱ्या महिलांसाठी जागेवरच कर्जाची उपलब्धता.
* आठवडे बाजार करणाऱ्या व जे.एल.जी. कर्जदार महिलांसाठी आर्युविमा संरक्षण.
* जेष्ठ नागरीकांच्या ठेवीवर ०.५% अधिक व्याज
* व्यक्तीगत जिव्हाळा आणि तत्पर व घरपोच सेवा.

## ठेवीचे व्याजदर

सेव्हिंग्ज ठेव ४%
१५ दिवस ते ४५ दिवस ६.५%
४६ दिवस ते ९० दिवस ७%
९१ दिवस ते १८० दिवस ७.५%
१८१ दिवस ते ३६५ दिवस ८.५%
३६६ दिवस ते ४५६ दिवस ९.५%
४५७ दिवस ते ५ वर्षापर्यंत १०%
दामदिडपट ठेव-४ वर्षे २ महिने १६ दिवस
दामदुप्पट ठेव -७ वर्षे २ महिने ११ दिवस
५ वर्षाच्या पुढे - ९.७५%

* जेष्ठ नागरिक ०.५% जादा व्याजदर

## बँकेचा शाखा विस्तार

शाखा म्हसवड फोन: (०२३७३) २७०११९
शाखा वडूज फोन: (०२१६१) २३२४७०
शाखा सातारा फोन: (०२१६२) २३८५२२
शाखा गोंदावले बु।। फोन: (०२१६५) २५८०१४
शाखा दहिवडी फोन: (०२१६५) २२०३८०
शाखा लोणंद फोन: (०२१६९) २२६०९०
शाखा धायरी, पुणे फोन: (०२०) २४६९०३८८

**शाखा म्हसवड व वडूज येथे लॉकर सुविधा उपलब्ध आहे.**

## * बँकर्स *

दि. महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि. मुंबई
सातारा जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. सातारा
बँक ऑफ बडोदा, दहिवडी
बँक ऑफ महाराष्ट्र शाखा-म्हसवड, गोंदवले बु।।
बँक ऑफ इंडिया शाखा - बुध,दहिवडी
आय.डी.बी.आय म्हसवड, राणंद,लोणंद,सोलापूर, कळंबोली,पुणे
एस. बी.आय. वडुज, दहिवडी,सातारा, ॲक्सीस बँक सातारा
यस बँक, पुणे

## अंतर्गत लेखापरिक्षक

श्री. मनोज आडके आणि कं. चार्टर्ड अकौटंटस् ,कोल्हापूर
व संगीता एस. अग्रवाल पुणे चार्टर्ड अकौटंटस

## शासकीय लेखापरिक्षक

के जी बी ॲण्ड जे ॲसोसिएटस्
चार्टर्ड अकौटंटस्, कोल्हापूर

## कायदेशीर सल्लागार

ॲड. भोईटे विलासराव एन.(सातारा)
ॲड. माने एस. एम.(म्हसवड)
ॲड. काझी एन. एच.(म्हसवड)

# लेखापरीक्षण अहवाल

१. आम्ही माणदेशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड या बँकेच्या सोबत जोडलेल्या दि. ३१.०३.२०१६ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा/तोटा पत्रकाचे तसेच सदर आर्थिक पत्रकांचा भाग असणारी महत्वपूर्ण आर्थिक धोरणे व अन्य अनुषंगिक माहिती यांचे लेखापरिक्षण केले आहे. आर्थिक वर्ष १.०४.२०१५ ते ३१.०३.२०१६ या कालावधीच्या आर्थिक पत्रकांमध्ये आम्ही लेखापरिक्षण केलेल्या ७ शाखा व मुख्य कार्यालय यांच्या आर्थिक व्यवहारांचा समावेश आहे.

व्यवस्थापनाची आर्थिक पत्रकांबाबतची जबाबदारी

२. सदरची आर्थिक पत्रके हि बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० मधील तरतूदीना अनुसरुन बनविण्याची जबाबदारी बँकेच्या व्यवस्थापनाची आहे. सदरच्या जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करताना आवश्यक असणाऱ्या अंतर्गत नियंत्रणासाठीचे नियम तयार करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा करणे आदि बाबीचां समावेश होतो की, ज्यामुळे सदरची आर्थिक पत्रके ही कोणत्याही प्रकारच्या गंभीर चुका अथवा दोष विरहित होतील.

लेखापरिक्षकांची जबाबदारी

३. आमची जबाबदारी ही आम्ही केलेल्या लेखापरिक्षणाच्या आधारे त्या आर्थिक पत्रकावर मत नोंदविण्याची आहे आम्ही आमचे लेखापरिक्षण हे दि इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकौटंटस ऑफ इंडिया यांनी निर्देशित केलेल्या ऑडिटींग स्टॅन्डर्डस्ना तसेच बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ महाराष्ट्र राज्य सहकारी कायदा १९६० व रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन केलेले आहे. त्या स्टॅन्डर्डनुसार आम्ही आमचे लेखापरिक्षणाचे नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण नियोजन व प्रत्यक्ष लेखापरिक्षण अशा पद्धतीने करणे अपेक्षित आहे की, जेणे करुन त्या आर्थिक पत्रकांमध्ये गंभीर स्वरुपाच्या चुका नाहीत, याची रास्त खात्री करुन घेतली जाईल.

४. आर्थिक पत्रकांमधील रक्कमांच्या संर्दभातील व इतर माहितीच्या संदर्भातील पुरावे नमुना तत्वांवर तपासण्याचा अंतर्भाव लेखापरिक्षणामध्ये होता. लेखापरिक्षणाच्या पद्धतीची निवड ही लेखापरिक्षकांचे अनुमान तसेच आर्थिक पत्रकांमध्ये चुका अथवा अफरातफर यामुळे गंभीर दोष निर्माण होण्याच्या शक्यतेची पडताळणी आदी बाबी गृहित धरुन केली जाते. अशा जोखमींची पडताळणी करुन योग्य अशी लेखापरिक्षण पद्धती निवडताना लेखापरिक्षक प्रामुख्याने बँकेने आर्थिक पत्रके तयार करताना अवलंबलेली अंतर्गत नियंत्रण पद्धती विचारात घेतात. लेखापरिक्षणामध्ये, व्यवस्थापनाने वापरलेल्या अकौटींग तत्वाच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे, व्यवस्थापनाने केलेल्या महत्वाच्या आर्थिक अंदाजाच्या योग्यतेचे मुल्यमापन करणे व आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे मुल्यमापन करणे याचा सुद्धा समावेश होतो.

५. आमचा विश्वास असा आहे की, आमच्या लेखापरिक्षणा दरम्यान आम्हाला मिळालेले पुरावे आम्हाला आमचे लेखापरिक्षणाबाबतचे मत बनविण्यासाठी यथार्थ आधार मिळवून देतात.

अभिमत

६. आमच्या मते आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन हे हिशोब, त्या सोबतची टिपण व त्यासोबत जोडलेली परिशिष्टे आणि आमच्या लेखापरिक्षण अहवालातील मुद्दे यांना अनुसरुन महाराष्ट्र सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व त्या खालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात तसेच भारतामध्ये सर्वमान्य असणाऱ्या अकौटींग तत्वांचे अनुपालन करतात आणि

अ. ताळेबंदच्या बाबतीत दि. ३१.३.२०१६ च्या बँकेच्या आर्थिक परिस्थितीची आणि

ब. नफा/तोटा पत्रकाच्या बाबतीत या दिनांकास संपणऱ्या वर्षाच्या मुदतीत बँकेच्या नफ्याची सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहेत.

७. सदर बँकेचे ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रक हे बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ च्या कलम २९ तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ च्या तरतुदीनां अनुसरुन तयार केले आहेत.

८. परिच्छेद क १ ते ५ मध्ये नमुद केलेल्या लेखापरिक्षण पद्धती आणि मुख्य व शाखा अहवालातील भाग अ, ब आणि क मध्ये नमुद केलेल्या शेऱ्यास अनुसरुन तसेच आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे आणि आम्हाला दिलेल्या संपूर्ण माहिती तसेच खुलाशावरुन आणि बँकेने सादर केलेल्या हिशोब व त्यासोबत जोडलेली परिशिष्ठ यांना अनुसरुन आम्ही अहवाल करतो की,

१. आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत व ते समाधानकारक आहेत.

२. आमच्या दृष्टीपतास आलेले बँकेचे व्यवहार हे बँकेच्या अधिकारक्षेत्रास अधिन राहून केलेले आहेत.

३ लेखापरिक्षणाच्या दृष्टीने शाखांकडून प्राप्त झालेली विवरणे पुरेशी आहेत.

९. आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा पत्रक हे अकौटिंग स्टॅन्डर्डस्‌चे सर्व साधारणपणे योग्य रितीने अनुपालन करतात.

१०. तसेच आम्ही अहवाल करतो की,

१. आम्ही तपासलेला ताळेबंद व नफा/तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरणाशी जुळत आहेत.

२. आमच्या मते पुस्तकांच्या तपसणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल, त्यावरुन संस्थेने संबंधीत कायद्यानुसार अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबांची पुस्तके ठेवलेली आहेत.

३. लेखापरिक्षण अहवाल तयार करताना आम्ही लेखापरिक्षण केलेल्या शाखाच्या अहवालांचा परामर्ष घेतला आहे.

**४. आर्थिक वर्ष २०१५-२०१६ करिता संस्थेस वर्ग ''अ'' देण्यात आलेला आहे.**

के जी बी अँण्ड जे असोसिएटस् करिता
चार्टर्ड अकौंटंटस्

(K G B & J ASSOCIATES, CHARTERED ACCOUNTANTS, KOLHAPUR)

संतोष घाळी
भागीदार
मेंबरशीप क्र. १०८९२५
फर्म. रजि. क्र. ११४८४९W

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : २७.०७.२०१६




रुपे डेबिट कार्ड



अत्याधुनिक मायक्रो एटीएम मशीन

## परिशिष्ट 'अ'

| | |
|---|---|
| १) बँकेचे नांव | :- माण देशी महिला सहकारी बँक लि. म्हसवड |
| २) मुख्य कार्यालयाचा पत्ता | :- मु. पो. म्हसवड ता. माण जि. सातारा पिन नं. ४१५५०९ |
| ३) नोंदणी क्रमांक व तारीख | :- एस. ए. टी. (माण)/बी.एन.के. (ओ)/११९/सन १९९६ दि. ३१/१०/१९९६ |
| ४) रिझर्व बँक परवाना क्रमांक व तारीख | :- एल.एन.एम.ए.एच.यु.बी.डी. १३६१ पी ,२७/१/१९९७ |
| ५) कार्यक्षेत्र | :- सातारा, सोलापूर, सांगली, रत्नागिरी, रायगड, पुणे,कोल्हापूर जिल्हे |

## दि. ३१/०३/२०१६ रोजीची आर्थिक स्थिती

(रक्कम ₹ लाखात)

| | | |
|---|---|---|
| शाखा-मुख्यालय | | ७ |
| सभासद | अ वर्ग | २५८३२ |
| | ब वर्ग | ४१३३ |
| वसुल भागभांडवल | | ₹ ५१७.३७ |
| राखीव व इतर निधी | | ₹ ३२७.१४ |
| ठेवी (₹८७८२.०७) | अ) बचत ठेव | ₹१२५६.४८ |
| | ब) चालू ठेव | ₹१३२.१० |
| | क) मुदत ठेवी | ₹७३९३.४९ |
| कर्जे( ₹५१९९.५२) | अ) तारणी | ₹ ३८९७.३५ |
| | ब) विनातारणी | ₹ १३०२.१७ |
| | क) अग्रक्रम क्षेत्र कर्जपुरवठा टक्केवारी | ९३.६१% |
| | ड) दुर्बल घटक कर्जपुरवठा टक्केवारी | ८८.४५% |
| बाहेरील कर्जे | | ₹ ०.०० |
| गुंतवणूक (₹३४४०.७३) | सातारा डी.सी.सी.बँक लि. | ₹ ३५२.२५ |
| | शासकीय मान्यताप्राप्त रोखे | ₹ २१७१.१३ |
| | इतर | ₹ ९१७.३५ |
| थकबाकीचे येणे कर्जाशी शेकडा प्रमाण | | २.२५% |
| ऑडीटवर्ग | | 'अ' |
| नफा | | ₹ ४१.८५ |
| एकूण कर्मचारी | | ६५ |
| खेळते भांडवल | | ₹ ९८७२.९७ |

## रिझर्व्ह बँक परिपत्रक क्र. ५२ दि. २५.०३.२०१४ नुसार बँकांनी ताळेबंद सोबत द्यावी लागणारी माहिती

(रक्कम ₹ लाखात)

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१५ | ३१/०३/१६ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १ | **भांडवल पर्याप्तता (शेकडा प्रमाण)** | १४.६०% | १७.००% | २.४०% |
| २ | **भांडवल निधी तपशील** | | | |
| | टायर- १ निधी | ६८१.७५ | ७६६.३ | ८४.५५ |
| | टायर -२ निधी | २५.१५ | २५.२४ | ०.०९ |
| | **एकूण निधी** | ७०६.९ | ७९१.५४ | ८४.६४ |
| | एकूण जोखीम मालमत्ता | ४८४२.८२ | ४६५५.५७ | -१८७.२५ |
| ३ | **भांडवल निधीचे जोखीम मालमत्तेशी प्रमाण** | | | |
| | टायर- १ निधी | १४.०८% | १६.४६% | २.३८% |
| | टायर -२ निधी | ०.५२% | ०.५४% | ०.०२% |
| | **एकूण निधी** | १४.६०% | १७.००% | २.४०% |
| | गुंतवणुक व त्यांचे मुल्यांकन | | | |
| ४ | **अ. एस.एल.आर गुंतवणुक** | | | |
| | १. सरकारी कर्जरोखे | १६४४.३९ | २१७१.१३ | ५२६.७४ |
| | **एकुण** | १६४४.३९ | २१७१.१३ | ५२६.७४ |
| | **ब. बँक व इतर गुंतवणुक** | | | |
| | १. राष्ट्रीयकृत खाजगी व सहकारी बँकांतील ठेवी | ३९५.२१ | ९४२.०० | ५४६.७९ |
| | २. डी.सी.सी.बँक ठेव | २०१.८२ | ३२७.५५ | १२५.७३ |
| | | ५९७.०३ | १२६९.५५ | ६७२.५२ |
| | **क. शेअर्समधील गुंतवणुक**<br>(एम.एस.सी.बँक,डी.सी.सी.बँक, बँक असो.) | ०.०५ | ०.०५ | ० |
| | **एकुण (अ+ब+क)** | **२२४१.४७** | **३४४०.७३** | **११९९.२६** |
| | **ड. मुल्यांकन** | | | |
| | १. दर्शनी किंमत | १६७६.१० | २२०१.१० | ५२५.०० |
| | २. पुस्तकी किंमत | १६४४.३९ | २१७१.१३ | ५२६.७४ |
| | ३. बाजारभावाने होणारी किंमत | १६५३.१४ | २१८१.९७ | ५२८.८३ |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१५ | ३१/०३/१६ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | ई. उत्पादनक्षमता नसलेली गुंतवणुक तपशील | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ५ | घरकुल, बांधकाम, व्यवसाय यासाठी दिलेल्या कर्जाचा तपशील | | | |
| | १. बांधकाम व्यवसायिक यांना दिलेले कर्ज | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | २. घरकुल व दुरुस्तीअंतर्गत दिलेले कर्ज | ३२३.५१ | ३२६.४१ | २.९० |
| | **एकूण** | **३२३.५१** | **३२६.४१** | २.९० |
| ६ | **शेअर्स व डिबेंचरर्स तारणावर दिलेली कर्जे** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | **संचालक नातेवाईक यांना दिलेली कर्जे** | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | फंडबेस कर्जाचा तपशील | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | नॉन फंडबेस कर्जाचा तपशील | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८ | **ठेवीचा सरासरी व्याजदर** | ९.३५% | ८.७८% | -०.५७ |
| ९ | **एन.पी.ए. चा तपशील** | | | |
| | अ. ढोबळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण | २.०९% | २.१७% | ०.०८% |
| | ब. निव्वळ एन.पी.ए. शेकडा प्रमाण | ०.४८% | ०.५२% | ०.०४% |
| १० | **एन.पी.ए. मुव्हमेंट** | | | |
| | आरंभीची एन.पी.ए. रक्कम | १०७.१३ | १११.०४ | ३.९१ |
| | + चालु वर्षातील एन.पी.ए. खाती | ३४.३० | ६२.०७ | २७.७७ |
| | - चालु वर्षातील वसुलीची रक्कम | ३०.३९ | ६०.३५ | २९.९६ |
| | शिल्लक एन.पी.ए. रक्कम | **१११.०४** | **११२.७६** | १.७२ |
| ११ | **एन.पी.ए. वर्गीकरणानुसार वसुलीचा तपशील** | | | |
| | सब स्टॅन्डर्ड | १०.६२ | ३४.३० | २३.६८ |
| | डाऊटफुल एक वर्षापर्यंत | ६.१० | ९.४४ | ३.३४ |
| | डाऊटफुल एक ते दोन वर्षापर्यंत | ७.१४ | २.४५ | -४.६९ |
| | डाऊटफुल तीन वर्षापर्यंत | ६.५३ | १४.१६ | ७.६३ |
| | एकुण एन.पी.ए. | ३०.३९ | ६०.३५ | २९.९६ |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१५ | ३१/०३/१६ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| १२ | एन.पी.ए. तरतुदीमधील चढउतार | | | |
| | आरंभीची तरतुद | ७१.५१ | ८६.०१ | १४.५० |
| | + चालु वर्षातील तरतुद | १४.५० | ०.०० | -१४.५० |
| | एकुण तरतुद | ८६.०१ | ८६.०१ | ०.०० |
| १३ | स्टॅन्डर्ड अॅसेट तरतुदीमधील चढउतार | | | |
| | आरंभीची तरतुद | १०.६० | १३.१० | २.५० |
| | + चालु वर्षातील तरतुद | २.५० | ०.०० | -२.५० |
| | एकुण तरतुद | १३.१० | १३.१० | ०.०० |
| १४ | नॉन परफॉर्मींग गुंतवणुकीपोटी केलेल्या तरतुदीमधील चढउतार | | | |
| | आरंभची तरतुद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतुद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| | एकुण तरतुद | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १५ | गुंतवणुक चढउतार निधी | | | |
| | आरंभीची तरतुद | ६.७६ | ६.७६ | ०.०० |
| | + चालु वर्षातील तरतुद | ०.०० | २.६३ | २.६३ |
| | एकुण तरतुद | ६.७६ | ९.३९ | २.६३ |
| १६ | गुंतवणुक,घसारा निधीमधील चढउतार | | | |
| | आरंभीची तरतुद | ०.०० | २.१५ | २.१५ |
| | + चालु वर्षातील तरतुद | २.१५ | ०.०० | -२.१५ |
| | एकुण तरतुद | २.१५ | २.१५ | ०.०० |
| १७ | खेळत्या भांडवलाशी | | | |
| | १. मिळालेल्या व्याजाचे शेकडा प्रमाण | १२.१०% | ११.५८% | -०.५२% |
| | २. इतर उत्पनाचे शेकडा प्रमाण | ०.३१% | ०.२६% | -०.०५% |
| | ३. ढोबळ नफ्याचे शेकडा प्रमाण | १.०५% | ०.६२% | -०.४३% |

| अ. नं. | तपशील | ३१/०३/१५ | ३१/०३/१६ | वाढ/घट |
|---|---|---|---|---|
| | ४. निव्वळ नफ्याचे शेकडा प्रमाण | ०.६०% | ०.४३% | -०.१७% |
| | ५. व्यवस्थापकीय खर्चाचे शेकडा प्रमाण | २.९०% | ३.४०% | ०.५०% |
| | ६. प्रती सेवक व्यवसाय | २२३.३१ | २१५.१० | -८.२१ |
| | ७. प्रती सेवक नफा | ०.८९ | ०.६४ | -०.२५ |
| १८ | **परकीय चलनामधील व्यवहाराची माहीती** | लागु नाही | | |
